INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# स्वातंत्र्यपूर्वकालीन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अधिवेशने आणि राष्ट्रवीरची भूमिका

## (Pre-Independence eras Indian National Congress Sessions and the role of the Rashtraveer)

**प्रा. विशाल रामदास रोकडे**
इतिहास विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी
ता. पारनेर, जि. अहमदनगर, ४१४३०५.
E-mail: vish.unipune@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2024-37273598/IRJHIS2408005

**प्रास्ताविक :-**

२८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथील तेजपाल संस्कृत पाठशाळेत संपूर्ण देशभरातील ७२ प्रतिनिधींनी एकत्र येऊन राष्ट्रीय सभेची स्थापना केली. यात सर ऍलन ह्युम, दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, के.टी. तेलंग, व्योमेशचंद्र बॅनर्जी, फिरोजशहा मेहता आदींनी पुढाकार घेतलेला दिसून येतो. या राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद व्योमेशचंद्र बॅनर्जी यांनी भूषविले. अखिल भारतीय पातळीवरील पहिले राजकीय व्यासपीठ म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची वाटचाल सुरू झाली. भारतीयांसाठी आवश्यक सोयीसुविधा, सुधारणांची ब्रिटिश सरकारकडे मागणी करणे, त्यासाठी अर्ज-विनंत्या करणे आदी पद्धतीने या सभेचे कार्य सुरू झाले. मवाळ, जहाल व गांधीवादी विचारधारेने टप्प्याटप्प्याने या संघटनेचे नेतृत्व केले. या राष्ट्रसभेने अखिल भारतीय पातळीवरील सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून कार्य केले. या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्यपूर्व काळातील जी अधिवेशने झाली त्याबाबत राष्ट्रावीर साप्ताहिकाने आपल्या स्थापनेपासूनच त्यास प्रसिद्धी तर दिलीच पण त्याच बरोबरीने काँग्रेस अधिवेशनांचे मूल्यमापन करून जनजागृती घडवून आणल्याचे दिसून येते.

राष्ट्रवीरने आपल्या स्थापनेपासूनच राष्ट्रसभेच्या अधिवेशनांना प्रसिद्धी देत आपली ठाम भूमिका मांडण्याचे कार्य सुरू ठेवलेले दिसून येते. २७ व २८ डिसेंबर १९२१ रोजी अहमदाबाद याठिकाणी

नियोजित अध्यक्ष चित्तरंजन दास तुरुंगात असल्याने हकीम अजमल खान यांना अध्यक्षपद देऊन सभेचे काम सुरु झाले. यावेळी जातीजातींत एकी वाढविणे, स्वदेशी, मद्यपान प्रतिबंध व अस्पृश्यता निवारण आदी ठराव पास करण्यात आले. या सभेच्या सुरुवातीस म. गांधीजींनी असहकारितेचा ठराव पुढे मांडला व सर्वानुमते म. गांधीजींना कमिटीचे सर्व अधिकार बहाल करण्यात आले. हकीम अजमल खान, सरदार वल्लभभाई पटेल आदींनी असहकारितेची कामगिरी व मलबरांतील दंग्यांबाबत खेद व्यक्त केला. २६ ते २८ डिसेंबर १९२६ रोजी राष्ट्रीय सभेचे ४१ वे अधिवेशन आसाम प्रांतातील गोहत्तीनजीक पांडवनगर (गुवाहाटी) येथे मद्रासचे एस. श्रीनिवास अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन भरले. याप्रसंगी म. गांधीजींनी देशाचे धुरीणत्व पुनः पत्करावे असे सर्वानुमते ठरले. सन १९२४ साली असेंब्लीनें राऊंड टेबल कॉन्फरन्सची मागणी केली आहे तीच राष्ट्रीय मागणी अशी यावेळी अध्यक्षांनी संमती दिली. यावेळी अध्यक्ष श्री. अय्यांगार यांनी द्विदल पद्धतीचा फोलपणा, खादीचे महत्व, मद्यपान प्रतिबंध, अस्पृश्यता निवारण, मजुरांची संघटना, चलन व हुंडणावळीचा प्रश्न, एकी विषयीचे विचार आदींबाबत जे विचार मांडले त्याचे राष्ट्रवीरने कौतुक केले आहे.

२१ ते ३१ मार्च १९३१ रोजी कराची येथे वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. या अधिवेशनाप्रसंगी भगतसिंग प्रभृतींच्या फाशीमुळे कराची येथील वातावरण इतके बदलले की, काँग्रेसच्या स्वागत मंडळाच्या अध्यक्ष्यांना आपले लिहून तयार असलेले लेखी भाषण रद्द करावे लागले. काँग्रेसच्या अध्यक्षांचा व इतर पुढऱ्यांचा स्टेशनवरील स्वागत समारंभ रद्द करण्यात आला. अधिवेशनास तंबू न ठोकता सर्व बाजूनी कंपाउंड घालण्यात आले. यावेळी नवजवान भारत सभेच्या लाल डगलेवाल्यांनी महात्माजींच्या नावाने निषेधप्रदर्शक आरोळया दिल्या. यावेळी 'गांधींचा धिक्कार असो, भगतसिंग चिरायू होवो' अशा प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या. २६ मार्च १९३१ रोजी म. गांधींचे जाहीर भाषण झाले त्यावेळी लोकांची अतोनात गर्दी झाल्यामुळे डॉ. चोयीतराय विशनदास हे वृद्ध गृहस्थ गुदमरून मरण पावले. यावेळी हिंदुस्थानातील युरोपयनांपेक्षा हिंदी व्यापाऱ्यांना अधिक सवलती मिळाल्या पाहिजे अशी म. गांधीजींनी मागणी केली. यावेळी तरुणांचे सुप्रसिद्ध पुढारी बाबू सुभाषचंद्र बोस यांचे कराचीत आगमन होताच लाल डगलेवाल्यांनी त्यांचे स्वागत करून मिरवणूक काढली.

परिषदेचे अध्यक्ष सरदार पटेल म्हणतात की, 'समेट दोन्ही पक्षांना सन्माननीय असाच आहे. आम्ही जर तडजोड स्वीकारली नसती तर आम्ही मोठीच चूक केली असती आणि गेल्या वर्षीचा स्वार्थत्याग निष्फळ झाला असता'. याबाबत राष्ट्रावीर लिहितो की, परिणामाच्या दृष्टीने तडजोड आवश्यक होती याविषयी मुळी वादच नाही. परंतु तो उभयपक्षी सन्माननीय आहे असे म्हणणे आत्मप्रतारणेचेच होय असे आमचे प्रामाणिक मत आहे. लाहोरला पास झालेल्या पूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावापासून आम्ही रतीभरही मागे

पाऊल घेऊ इच्छित नाही असे म्हणत सेफगाड्र्सनाही सरदार पटेलांनी मान्यता दिली. याबाबत राष्ट्रवीर लिहितो की, संपूर्ण स्वातंत्र्य आणि पूर्ण स्वराज्य यांत त्यांनीच ठरविलेल्या व्याख्येत बरीच तफावत आहे असे त्यांचे मन त्यांना ग्वाही देत असावे असे दिसते.

१२ ते १४ जुलै १९३७ रोजी फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन पार पडले. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पं. जवाहरलाल नेहरू यांनी काम पाहिले. या अधिवेशनात म. गांधीजींनी भंगी काम करणाऱ्या स्वयंसेवकांना उद्देशून भाषण केले. गांधीजी म्हणाले की, 'दक्षिण आफ्रिकेत फार वर्षांपूर्वी मी स्वतः भंगी काम सुरु केले. भंग्यांच्या जन्मास येणे फार मोठे पुण्याईचे काम आहे. यावेळी ग्रामीण भागात काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले असले तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांना व बहुजन समाजाला किती होईल याबद्दल महर्षी शिंदे यांनी शंका व्यक्त केली होती. १९ ते २१ फेब्रुवारी १९३८ रोजी सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली ५१ वे अधिवेशन पार पडले. यावेळी बोस यांनी ब्रिटिश प्रशासनाविषयी विचार प्रकट केले. बोस म्हणाले की, ब्रिटिश साम्राज्य ही राजकारणात एक विचित्र संस्था आहे. स्वायत्त वसाहती यांचे मिश्रण आहे. अशा परिस्थितीत ब्रिटिश साम्राज्याचे रूपांतर स्वतंत्र राष्ट्रसंघात करण्याची कल्पना ब्रिटिश लोकांना रुचेल तर ते चांगले होईल पण असे व्हायच्या अगोदर ग्रेट ब्रिटनमध्ये साम्राज्यवादी राज्यपद्धती स्थापन झाली पाहिजे.

१९ व २० मार्च १९४० रोजी रामगड येथे मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली ५३ वी काँग्रेसची बैठक पार पडली. जोरदार पावसामुळे अडीच तासांतच काँग्रेसचे अधिवेशन बरखास्त करावे लागले. यावेळी पाटणा वर्किंग कमिटीने जो ठरावाचा मसुदा तयार केला होता त्यास अधिवेशनात मान्यता देण्यात आली. तद्नंतर गांधीजींनी भाषण केले यात ते म्हणाले की, 'चरखा, हिंदू -मुसलमान ऐक्य, अनत्याचार या आपल्या अटी पूर्ण झाल्याशिवाय आपल्या अनुयायांच्या एकनिष्ठतेबद्दल खात्री झाल्याशिवाय आपण लढा सुरु करणार नाही. याच अधिवेशनाप्रसंगी काँग्रेसच्या मंडपाजवळ ६ एप्रिल रोजी सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या गटाची बैठक पार पडली. यात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता राष्ट्रीय लढा सुरु करण्यात यावा आणि त्याकरिता एक अखिल भारतीय युद्ध मंडळ (कौन्सिल ऑफ ॲक्शन) नेमण्यात आले. एकूणच गांधीजींची मर्जी विचारांत घेण्यास बोस तयार नाहीत असे राष्ट्रवीर ठामपणे लिहितो.

**समारोप :-**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. काँग्रेसची स्थापना ही ब्रिटिशविरोधी भावना कमी करून राज्यकारभार सुरळीतपणे चालावा म्हणजेच सुरक्षाकवच पद्धतीने केली असे प्रतिपादन बिपनचंद्र पाल यांनी केले आहे. परंतु या संघटनेचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत

चाललेले दिसून येते. सुरुवातीस मवाळ मध्यंतरी जहाल व अखेरीस गांधींवादी विचारधारेने राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व केले. राष्ट्रवीरची स्थापनाच मुळी गांधीवादी कालखंडात झालेली दिसून येते. राष्ट्रवीर पत्राने सातत्याने या काँग्रेसच्या अधिवेशनाचे मूल्यमापन केलेले दिसून येते. ब्रिटिश साम्राज्यवादास राष्ट्रवीरने विरोध केलाच परंतु ऐनप्रसंगी काँग्रेसच्या चुकीच्या धोरणावरही कडक शब्दांत ताशेरे ओढले. एकूणच राष्ट्रवीरने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनांची विस्तृत माहिती प्रकाशित करून त्याबाबत जनतेत प्रबोधन घडवून आणलेले दिसून येते.

**संदर्भ साधने :-**


१. राष्ट्रवीर, १ जानेवारी १९२२, पृ. ३.

२. राष्ट्रवीर, ४ जानेवारी १९२७, पृ. ३.

३. राष्ट्रवीर, ३१ मार्च १९३१, पृ. ४.

४. राष्ट्रवीर, ७ एप्रिल १९३१, पृ. २.

५. राष्ट्रावीर, २९ डिसेंबर १९३६, पृ. ४.

६. राष्ट्रवीर, २२ फेब्रुवारी १९३८, पृ. ३.

७. राष्ट्रवीर, २२ मार्च १९४०, पृ. ३.